अतिशय महत्वाचे
कालमर्यादा

संलग्न गटविमा बचत योजना (जीएसएलआय) सन २०२२-२३ साठी नुतनीकरण करणे बाबत आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचना.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
## अर्थ प्रशासन विभाग

जा.क्र.अप्रवि/संगवियो/२०२२-२३/१८९६ दिनांक: १५/०२/२०२२ १६

## परिपत्रक

वर्ष २०२२-२३ साठी संलग्न गटविमा योजनेचे नुतनीकरण करतांना माहिती तयार करावयाची असल्याने खालील सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. वर्ष २०२२-२३ साठी संलग्न गटविमा योजनेचे नुतनीकरणासाठी आपले कार्यालयातील आस्थापनेवरील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी **दिनांक ३१ मार्च २०२२** पर्यत विहीत कालावधीत Statement-A मध्ये या कार्यालयास दोन प्रतित सादर करण्यात यावी.

२. संलग्न गटविमा योजनेच्या वर्गणीची कपात ही कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधीतून होत असतांना ज्यावेळी खातेदार भविष्य निर्वाह निधीतून अग्रीम उचल करत असेल तर १/४ इतकी रक्कम कर्मचा-याच्या खाती शिल्लक राहील हे कटाक्षाने पहावे. हिच बाब नियमित कर्मचा-यांच्या बाबत सुध्दा कटाक्षाने पाळण्यात यावी.

३. दिनांक १-५-२०२१ ते ३०-४-२०२२ या कालावधीत मृत्यु पावलेले/राजीनामा दिलेले/स्वेच्छा सेवा निवृत्ती व रुग्णता सेवा निवृत्ती झालेले/होणारे अशा कर्मचा-यांची वेगळी यादी Statement-B मध्ये द्यावी.

४. ज्या कर्मचा-यांना गटविमा सदस्यत्व क्रमांक निर्गमीत झाला आहे व सद्यस्थितीत ते कर्मचारी पदोन्नतीमुळे मुळ वर्गवारीपेक्षा वरच्या वर्गवारीत प्रवेश केला असेल अशा कर्मचा-याची माहिती त्या पदाची वेतनश्रेणीसह Statement-C मध्ये सादर करावी.

५. जे कर्मचारी/अधिकारी विद्यापीठ सोडून अन्य विभागात कार्यरत झाले असतील अशा कर्मचा-यांची माहिती Statement-D मध्ये देण्यात यावी.

६. कर्मचारी सेवानिवृत्त झालेनंतर संलग्न गटविमा योजनेसंबंधी रक्कम संबंधीताला मिळणेबाबत या कार्यालयास अर्ज प्राप्त होतात त्यात असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी सेवानिवृत्त झालेनंतर सहा महिन्यांनी त्यांचे प्रकरण या कार्यालयास प्राप्त होते त्यात संबंधीताचा गटविमा सदस्यत्व क्रमांक चुकीचा दर्शविला असतो किंवा दर्शविलाच नसतो. गटविमा क्रमांक अस्तित्वात असेल तर प्रस्ताव पाठवितांना अचुकता असावी याबाबत आहरण व संवितरण अधिका-यांनी याची खात्री घ्यावी.

उपरोक्त नमूद असलेल्या सर्व बाबी संबंधीत कर्मचा-यास अवगत करुन देण्यात याव्या. चुकीची माहीती पाठविल्यास तसेच विहीत कालावधीत माहिती प्राप्त न झाल्यास आहरण व संवितरण अधिकारी स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. उपरोक्त बाबीस सर्वप्राथम्य देवून अचुक माहीती वेळेवर सादर करण्याची दक्षता विभाग प्रमुख/आहरण वितरण अधिकारी हयांनी घ्यावी हि विनंती.

**संलग्न गटविमा योजनेचे सध्या अस्तित्वात असलेले दर व वर्गवारी खालीलप्रमाणे आहेत**

| वर्गवारी | वेतनश्रेणी | विमा संरक्षण रुपये | वार्षीक वर्गणी रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ | ६व्या वेतन आयोगानुसार PB-3 (१५६००-३९१००) PB-4 (३७४००-६७०००) | रुपये १,२०,०००/- | रुपये १४४०/- |
| ब | ६व्या वेतन आयोगानुसार PB-2 (९३००-३४८००) | रुपये ९०,०००/- | रुपये १०८०/- |
| क | ६व्या वेतन आयोगानुसार PB-1 (५२००-२०२००) | रुपये ६०,०००/- | रुपये ७२०/- |
| ड | ६व्या वेतन आयोगानुसार PB-1S (४४४०-७४४०) | रुपये ३०,०००/- | रुपये ३६०/- |

**संलग्न गटविमा योजनेचे सध्या अस्तित्वात असलेले दर व वर्गवारी खालीलप्रमाणे आहेत**

| वर्गवारी | वेतनश्रेणी | विमा संरक्षण रुपये | वार्षीक वर्गणी रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ | ७व्या वेतन आयोगानुसार Level S-19 to S-26 (५५१००-२११५००) Level S-27 to S-31 (११८५००-२२००००) | रुपये १,२०,०००/- | रुपये १४४०/- |
| ब | ७व्या वेतन आयोगानुसार Level S-13 to S-18 (३५४००-१५५८००) | रुपये ९०,०००/- | रुपये १०८०/- |
| क | ७व्या वेतन आयोगानुसार Level S-5 to S-12 (१८००-१०१६००) | रुपये ६०,०००/- | रुपये ७२०/- |
| ड | ७व्या वेतन आयोगानुसार Level S-1 to S-4 (१५०००-५४०००) | रुपये ३०,०००/- | रुपये ३६०/- |

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

प्रति:

१. आहरण व संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी (सर्व) यांना माहितीसाठी अग्रेषित.
२. वेतन व लेखा अधिकारी, अकोला/नागपुर यांना माहितीसाठी.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

टिप:- ज्या कर्मचा-याची नियूक्ती फक्त ११ महीण्याचे कालावधी करीता आहे व जे कर्मचारी डी.सी. पी.एस.योजनेचे सभासद आहेत त्यांची माहीती पाठविण्यात येवू नये.

## STATEMENT-A

Statement showing Employees details of GSLIS Scheme for the year 2022-23

| Sr.No. | Class | Name of employee | Desig. | Pay Scale | UEPF No. | GSLIS No. | Date of Birth | Date of appoint. As per University Order |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | A | | | | | | | |
| 2 | B | | | | | | | |
| 3 | C | | | | | | | |
| 4 | D | | | | | | | |

**Signature of DDO**

## Statement-B

Statement showing those employees who retired/death/VRS/Resign wef 1.5.21 to 30.4.22

| Sr.No. | Name of employee | Desig. | GSLIS No. | UEPF No. | Date of Birth | Date of retirement by Univ.Order |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 8 | 9 |
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |

**Signature of DDO**

## Statement-C

**Statement showing those employees who are already GSLIS Member and need upgradation of class as per selection or promotion with Pay Scale for the year 2022-23**

| Sr. No. | Name of employee | Desig. | Existing Pay scale | Existing class | New Pay scale | New Class | GSLIS No. | UEPF No. | Selection or Promotion by Univ.Order No. & Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |

**Signature of DDO**

## Statement-D

**Statement showing those employees who resigned/Leave University Service and joined other Deptt.**

| Sr.No. | Class | Name of employee | Desig. | Pay Scale | UEPF No. | GSLIS No. | Date of Resigned/ Leave University Service | Whether Final payment of GSLI Proposal sent to this office Yes/No(Ref.No) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

**Signature of DDO**